# प्रेसनोट

दिनांक २६/०५/२०२२

आरोपी लोकसेवक १) उत्तम वामन गायकवाड, वय ३९ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पुरवठा निरीक्षक, तहसिल कार्यालय मंगळवेढा २) खाजगी इसम इसम बालाजी सिध्देश्वर यादव, वय २५ वर्षे, संगणक चालक, शासकिय धान्य गोदाम, मंगळवेढा यांच्यावर रु १२००/- ची लाच मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी क्र.०१ यांनी आरोपी क्र.०२ यांचे मार्फतीने स्विकारलेवरुन गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र |
| गुन्हा नोंद क्रमांक | मंगळवेढा पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८ चे कलम ७, ७ (अ) प्रमाणे |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) उत्तम वामन गायकवाड, वय ३९ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पुरवठा निरीक्षक, तहसिल कार्यालय मंगळवेढा<br>२) खाजगी इसम इसम बालाजी सिध्देश्वर यादव, वय २५ वर्षे, संगणक चालक, शासकिय धान्य गोदाम, मंगळवेढा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १२००/- रु |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १२००/- रु |
| थोडक्यात माहिती | पडताळणी दि १२/०५/२०२२, दि २६/०५/२०२२<br>सापळा दि २६/०५/२०२२<br>यातील तक्रारदार यांचे वडार गल्ली, मंगळवेढा येथे स्वस्त धान्य दुकान असुन त्यांना प्रत्येक महिन्याला धान्याचे चलनाची रक्कम ही तहसिल कार्यालय, मंगळवेढा अंतर्गत असलेल्या शासकिय धान्य गोदाम, मंगळवेढा येथे शासकिय रक्कम चलनाव्दारे भरावी लागते. यातील तक्रारदार यांनी माहे मे /२०२२ या महिन्याचे मासिक धान्याचे चलनाची रक्कम भरण्याचे अनुषंगाने शासकिय धान्य गोदाम, मंगळवेढा येथील आरोपी क्र.०२ यादव यांना भेटले असता आरोपी क्र.०२ यादव यांनी तक्रारदार यांना चलनाचे रक्कमे व्यतिरिक्त त्यांचे स्वतः करीता २५०/- व साहेबांचे करीता १२००/- रु अशी रक्कम मासिक हप्ता म्हणुन दयावी लागेल असे म्हणुन लाचेची मागणी केली.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.१२/०५/२०२२, दि २६/०५/२०२२ दरम्यान दोन्ही आरोपींकडे पडताळणी कारवाई करण्यात आली असता पडताळणी कारबाई दरम्यान आरोपी क्र.०२ यादव यांनी वरील प्रमाणे लाच रक्कमेची मागणी केली व दि.२६/०५/२०२२ रोजी यातील आरोपी क्र.०१ गायकवाड यांचेवर पडताळणी कारवाई केली असता पडताळणी कारवाई दरम्यान त्यांनी आरोपी क्र.०२ यादव यांनी मागणी केलेल्या लाच रक्कमेची मागणी करुन त्यास दुजोरा दिला. त्यास अनुसरुन दि.२६/०५/२०२२ रोजी सदर प्रकरणामध्ये सापळा कारवाई केली असता यातील आलोसे क्र.०१ गायकवाड यांनी सदर लाचेची रक्कम आरोपी क्र.०२ यादव यांचेकडे देण्यास सांगुन सदरची लाच रक्कम मार्फतीने स्विकारल्यानंतर दोन्ही आरोपींना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन सविस्तर गुन्हा दाखल करण्यात येत आहे. |
| मार्गदर्शन अधिकारी | श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाप्रवि, पुणे<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे |
| पर्यवेक्षण अधिकारी | श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, सोलापूर |
| सापळा पथक | श्री. उमाकांत महाडीक, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर<br>पोलीस अंमलदार- पोना घाडगे, पोशि मुल्ला, पोशि सण्णके चापोशि सुरवसे, सर्व ने. अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **टोल फ्री क्रमांक- १०६४ वर किंवा पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर येथे** संपर्क साधावा. ,

**संकेतस्थळ -** www.acbmaharashtra.gov.in

**ई मेल -** www.acbwebmail@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार –** acbmaharashtra.net

**दुरध्वनी क्रमांक-** ०२१७-२३१२६६८

**व्हॉटस ॲप क्रमांक –** ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर
सत्यमेव जयते

Kchandekar

**पोलीस निरीक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर**